आर.सी.सी.क्रं.२८३/२०१८

नि. क्रमांक ४८.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०६ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :-

माझे नाव :- अरविंद बाळू काटे ,

वय सुमारे :- ३९ वर्षे, व्यवसाय :- पो. नि. ,

नेमणुक. :-मुंबई शहर पोलीस ठाणे.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.ठाकरे यांच्यामार्फत.**

०१. सन २०१७ मध्ये लोणावळा शहर पोलीस ठाण्यामध्ये मी सहायक पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. मी पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असताना फिर्यादी प्रिया सावंत हिने फिर्याद दिली होती की, त्यांचा मालकीच्या खंडाळा येथील बंगल्यात आरोपी बळजबरीने घुसून धाकदपटशाह दाखवत आहेत. आता मला सदरची खबर दाखवण्यात आली. सदरची खबर ही तीच आहे. खबरेस अगोदरच नि क्र. ३६/क देण्यात आलेला आहे.

०२. सदर खबरेवरुन गुन्हा नों. क्र. ३९/२०१७ असा नोंदवण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला होता. तपासादरम्यान दुस-या दिवशी मी घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनाम तयार केला. आता मला सदरचा पंचनामा दाखवण्यात आला. पंचनाम्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्यास **नि क्र. ४९/क** देण्यात येतो.

०३. तपासादरम्यान मी सर्व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासादरम्यान मी आरोपींना अटक केले. आता मला आरोपी क्र. १ व २ यांचा अटक पंचनामा दाखवण्यात आला. अटक पंचनाम्यावर माझी सही आहे. अटक पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. अटक पंचनाम्यास अनुक्रमे **नि क्र. ५०/क व ५१/क** देण्यात येतो.

०४. तपासाअंती मला असे दिसून आले की, आरोपींनी खबरीच्या मालकीच्या घरामध्ये घुसून अतिक्रमण केले व खबरीस धाकदपटशाह दाखवला. आरोपींना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे विद्वान वकील श्री. संजय वांद्रे यांच्या तर्फे शपथेवर सुरु.**

०५. हे म्हणणे खरे आहे की तपास माझ्याकडे सोपवल्यानंतर मी खबरीचा जवाब नोंदवला नाही. हे म्हणणे खरे आहे की, खबरीच्या घराच्या मालकीबाबत कागदपत्रे मी आरोपींकडून हस्तगत केले नाही. खबरीच्या नावे मिळकत असल्याबाबत मी सिटी सर्वे व नगरपरिषद येथे जाऊन चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घर मिळकत ही खबरीच्या नावे असल्याबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. ३ व ४ विरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासलेल्या साक्षीदारांनी आरोपीविरुध्द कोणताही पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा मी पोलीस ठाण्यात तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदाराचे जबाब नोंदवले हे खोटे सांगत आहे.

०६. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादीच्या मालकीच्या बंगल्यामध्ये घुसून अतिक्रमण केल्याचे व खबरीस धाकदपटशाह दाखवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ३ व ४ तर्फे उलटतपास पुर्ण.**

**आरोपी क्र. १ तर्फे स्वतः गिरीश वामन फिरके यांच्यातर्फे उलटतपास शपथेवर सुरु.**

०७. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व आरोपी यांच्यातील वाद हा मिळकतीच्या हक्काविषयी आहे. तपासादरम्यान फिर्यादीच्या घरावरील ताबा हा फिर्यादीचा असल्याचे मला दिसून आले. घटनेच्या दिवशी फिर्यादी ही बाहेरगावी हजर होती. खबर ही फिर्यादीच्या नोकराने सांगितल्यावरुन नोंदवली होती. घटनेच्या दिवशी खबरी ही घरामध्ये हजर असल्याबद्दल पुरावा अभिलेखावर दाखल केलेला आहे. घटना ही १८ फेब्रुवारी २०१७ रोजी घडली होती व खबर ही दि. ९ मार्च २०१७ रोजी नोंदवण्यात आली होती. घटनास्थळ पंचनामा हा घटनेच्या दुस-या दिवशी तयार केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सर्व साक्षीदार हे खबरीचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या नोकराच्या बायको कुंदा उंब्रे हिचा जबाब हा दि. १५.०१.२०१८ रोजी नोंदवण्यात आला होता.

०८.		फिर्यादीचा नोकर व त्याची बायको हे घटनेस प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. फौजदारी धाकदपटशाह हा आरोपींनी फिर्यादीचा नोकर यास दाखवला होता. खबरीच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडल्याबद्दल कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केलेली आहे. पंचनाम्यामध्ये गेटच्या कुलूपाचा उल्लेख नमूद नाही. अंकूश उंब्रे याने त्याची मालकीन प्रिया सावंत हिला फोन केल्याबद्दल कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. दि. १८ फेब्रुवारी २०१७ रोजी आरोपी क्र. ३ फिर्यादीच्या बंगल्यामध्ये हजर असतांना त्यास अटक का केली नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी मी घटनास्थळी भेट दिल्याबाबत स्टेशन डायरीची नोंद मी अभिलेखावर दाखल केलेली नाही. तपासादरम्यान मी आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१) प्रमाणे नोटीस दिली होती व आरोपी पोलीस ठाण्यामध्ये हजर झाले होते. आरोपी हजर होत नसल्याबद्दल पत्र मी दिले नव्हते.

०९.		हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हजर होऊन देखील मी त्यांना अटक केली होती. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या स्थगिती आदेशाबद्दल मला माहिती नाही. फिर्यादीचा वाद हा दिवाणी स्वरुपाचा असल्याचे मी फिर्यादीला कळविले नव्हते. इतर उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. १ ने स्वीकारला.

**आरोपी क्र. १ तर्फे उलटतपास पूर्ण.**

**आरोपी क्र. २ तर्फे उलटतपास आरोपी क्र. २ स्वतः तर्फे शपथेवर सुरु.**

१०.		हे म्हणणे खरे आहे की, मी ट्रस्ट डीड व विल डिड पाहिले नव्हते. दि. ३१ डिसेंबर २०१७ रोजीच्या पत्रासोबत ट्रस्ट डिड व विल डिडची प्रत लावल्याचे मला माहित नाही. खटल्यातील मिळकत ही ट्रस्टशी संबंधीत असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, खटल्यातील मिळकत ही वर्षानूवर्षे घनश्याम काळसेकर हे पाहत असल्याचे मला माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, खटल्यातील मिळकत ही घनश्याम काळसेकर व त्यांचे मोठे बंधू पुरुषोत्तम काळसेकर व त्यांच्या दोन अविवाहित बहिणी देखभाल करत होत्या. दि. ३१ डिसेंबर २०१७ रोजीच्या पत्रामध्ये बंगल्याचे कुलूप हे संदिप मोरे यांनी बदलल्या बद्दल कळविल्याचे मला माहित नाही.

११.		प्रस्तुत खटलयातील घटना ही घटनेच्या दिवशीच घडली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या पत्रामध्ये घटना ही १८ फेब्रुवारी २०१७ रोजी घडली नसल्याचे नमूद केल्याचे मला माहित नाही. प्रस्तुत खटल्याच्या घटनेविषयी इतर

न्यायालयामध्ये प्रलंबित दाव्याबद्दल मला माहिती नव्हती. खबरीने प्रोबेट पिटीशन दाखल केल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतची फिर्याद ही मी आरोपींना खोटया गुन्हयामध्ये गोवण्यासाठी दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तूत खटल्यातील खबरी ही मिळकतीच्या कब्जामध्ये नसतांनाही प्रस्तुतची खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खबरीचया नावे मिळकतीच्या मालकीबद्दल कोणताही पुरावा नसतांना प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे. खबरीच्या नावे मिळकतीच्या मालकीबद्दल कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत खटल्यातील घटनेला कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. इतर उलटतपास आरोपी क्र. १,३ व ४ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास आरोपी क्र. २ ने स्वीकारला.

**उलटतपास आरोपी क्र. २ तर्फे पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

VISHNU RAMCHANDRA DOIFODE

Digitally signed by VISHNU RAMCHANDRA DOIFODE
Date: 2026.02.18 16:23:03 +0530

**दिनांक. १८/०२/२०२६.** **(श्री. व्ही. आर. डोईफोडे)**

**४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी वडगाव,**

**ता.मावळ, जि. पुणे.**